शैक्षणिक संदर्भ अंक १३५ (एप्रिल - मे २०२२)

# स्वयंपाकघरातलं प्राणीसंग्रहालय

लेखक : कृष्णकुमार अनुवाद : सौमित्र

# स्वयंपाकघरातलं प्राणीसंग्रहालय

**लेखक : कृष्णकुमार** **अनुवाद : सौमित्र**



त्यावेळी मी पहिलीत होतो. शाळेतून आलो की लगेच काकांच्या घरी जात असे. आमच्याच गल्लीत राहत होते ते. एकटेच राहायचे. सगळं काम स्वतः करायचे. त्यांच्या टेबलावर पुस्तकांचा आणि कागदांचा इतका मोठा ढीग असायचा, की वाटायचं कोणत्याही क्षणी कोसळेल, पण असं कधीच झालं नाही. कारण टेबलाचे पाय एखाद्या


हत्तीच्या पायासारखे मजबूत होते. जी गत टेबलाची होती तीच स्थिती दोन्ही खोल्यांची आणि स्वयंपाकघराची सुद्धा होती. स्वयंपाकघरात पण एक टेबल होतं. त्याच्यावर एखादं पुस्तक किंवा वही असेल तर मी काकांना त्याची आठवण करून देत असे. या टेबलाजवळ एक उंच कपाट होतं. ते कायम बंद असे. मला माहिती होतं त्यात काकांनी तरतऱ्हेचं समान भरून ठेवलं होतं- बिस्किटं, पावापासून ते मोठी मोठी भांडी आणि डब्ब्यांपर्यंत.

काकांची एक सवय मला अजूनही आठवते. त्यांना गप्पा मारता मारता छोट्या छोट्या वस्तूंच्या गोष्टी सांगण्याचा छंद होता. त्यांच्या घरातल्या प्रत्येक न प्रत्येक वस्तूची गोष्ट मी ऐकलेली आहे, खरंच! टेबलावर ठेवलेल्या दिव्याला ते शुभा म्हणत असत. एका मुलीला पाच वर्षांसाठी दिवा बनवून ठेवलंय असं ते सांगत. शुभा मन लावून अभ्यास करत नसे म्हणून तिला दिवा बनून सारखं पुस्तकात डोकावून वाचत राहायची वेळ आलीय असं ते म्हणत. कदाचित त्यांना असं वाटत असेल की पाच वर्षानंतर जेव्हा दिवा पुन्हा शुभा बनेल तेव्हा तिची सगळी पुस्तकं वाचून झालेली असतील आणि ती हुशार झालेली असेल.

पण ही तर अगदी छोटीशीच गोष्ट होती. मला तर त्यांनी खूप मोठ्या आणि अजब गोष्टी पण सांगितल्या होत्या. एक किस्सा एक देवता आणि तिचा साथीदार राजा आणि त्यांच्याशी काकांच्या भांडणाचा होता. काका फार भारी आवाजात या लढाईचं वर्णन करायचे. ही लढाई खरोखरच तुंबळ झाली असली पाहिजे. एकीकडे काका एकटे आणि दुसऱ्या बाजूला देवता आणि राजा एकत्र लढत होते. पण काकांच्या हुशारीपुढे त्यांचा टिकाव लागला नाही.

मला वाटतं लोक ज्याला जादू म्हणतात अशी कोणतीतरी कला काकांना नक्की येत असणार. लढाईत राजा आणि देवतेला जमिनीवर उतरवणं गरजेचं होतं, म्हणून काकांनी देवतेच्या विमानाला पंखा बनवून टाकलं आणि राजाच्या हत्तीचं पुस्तकांचं रॅक केलं. पंखा अजूनही छताला लटकून गरागरा फिरतोय आणि रॅकवर भरपूर पुस्तकं ठेवली आहेत. काकांनी सांगितलं की यातली बरीचशी पुस्तकं जादूवरच आहेत.

वाहनच गायब झाल्याने दोन्ही शत्रू जमिनीवर पडले आणि काकांनी त्यांना सहजच



हरवलं. लढाई झाल्यावर काका त्यांचे महाल बघायला गेले. काकांनी सांगितलं, की पहिल्यांदा त्यांना त्या महालातली एकही वस्तू आपल्या उपयोगाची नाही असंच वाटलं. गडद रंगाचे मोठे मोठे पडदे, जाडे जाडे कुरूप खांब, जड जड खुर्च्या हे बघून काकांचा मूड इतका खराब झाला की त्यांनी बाहेर येऊन एका हॉटेलात चहा प्यायला. चहा पिता पिता त्यांच्या मनात आलं की यातल्या काही गोष्टींना आपल्या उपयोगाच्या वस्तुंमध्ये बदलून आपण घरी घेऊन जाऊ शकतो. मग ते परत महालात गेले. राजाच्या सिंहासनाचा त्यांनी एक बसायचा मोढा बनवला. पडद्यांचा झाडू आणि चांदीच्या तस्ताचं पेन्सिलीचं टोकयंत्र बनवलं. एकेक करून तिथल्या सगळ्या वस्तू त्यांनी स्वतःच्या उपयोगाच्या वस्तूंमध्ये बदलून टाकल्या. हा किस्सा सांगून झाला, की काका त्या सगळ्या वस्तू मला

दाखवायचे. टेबलाजवळचा मोढा बघून मी राजाच्या सिंहासनाची कल्पना करत असे आणि छताशी फिरणाऱ्या पंख्याचं कल्पनेतच विमान करत असे.

एकदा एका रविवारी सकाळी सकाळी माझा मित्र लल्ला आमच्याकडे आला. आम्ही दोघं काकांकडे गेलो तेव्हा ते स्वयंपाकघरात चहा करत उभे होते. त्यांनी आम्हाला विचारलं, “काय रे ? काय खाणार?”. चहाचं विचारलं नाही कारण मुलांनी चहा प्यायलेला त्यांना आवडतं नसे. मी खूप विचार करून सांगितलं, “आधी तुम्ही कपाट उघडून दाखवा, तुमच्याकडे काय आहे ते...मग मी सांगतो.”

चहाचं पातेलं उतरवत काकांनी जे उत्तर दिलं ते ऐकून मी आणि लल्ला दोघंही उडालोच...

“यात कुत्री, मांजरं आणि उंदीर आहेत.” इतकं बोलून काका गप्प झाले. आणि आम्ही भांबावून त्या कपाटाकडे पाहात राहिलो.

दोन तीन मिनिटांनी लल्लाने विचारलं,“ ते तिघं एकत्र कसे राहतात? उंदरांना मांजर आणि मांजरांना कुत्रे खात नाहीत का?” “म्हणून तर त्यांना वेगवेगळया कप्प्यात ठेवलं आहे. वरती कुत्रे, मध्ये मांजरी आणि खाली उंदीर” काका म्हणाले.

लल्लाचा वाढता गोंधळ बघून मी त्याला मदत करायचं ठरवलं. खरंतर मी स्वतःच खूप गोंधळलो होतो.

“लल्ला, हे सगळं खोटं आहे अरे.” मी म्हणालो, “मी तुला खरं काय ते सांगतो. मी हे कपाट बघितलं आहे. वरती डब्बे आहेत, मधल्या कप्प्यात भांडी आणि खालच्या

खणात बिस्किटं, पाव असा खाऊ". असं म्हणत मी कपाट उघडायला पुढे गेलो. मी वळलोच आणि तेवढ्यात काकांनी हातानेच मला थांबवलं. " या कपाटातले प्राणी खूप



घाबरट आहेत. खास करून लल्लाला ते खूप घाबरतात. त्यामुळे कपाट उघडताच ते गायब होतात."

काकांचं बोलणं ऐकून लल्लाचे डोळे विस्फारले. त्याने विचारलं," आता ते कुठे जातील?" काकांचं उत्तर जणू काही आधीपासूनच तयार होतं. ते लगेच म्हणाले, " कुत्रे डब्बे बनतात, मांजरी भांडी आणि उंदीर बिस्किटं, पाव वगैरे. "

मला वाटलं की काकांचा डाव आता माझ्या लक्षात यायला लागला. तितक्यात लल्लाला एक उपाय सुचला. तो हळूच आवाजात म्हणाला, "काका, मी लपून बघतो. तुम्ही कपाटाचं दार थोडं किलकिलं करा, कोणाला काही कळणार नाही." असं म्हणून तो खरंच हलक्या पावलांनी स्वयंपाकघराच्या दारामागे जाऊन उभा राहिला.

आता काका काय करतील? पुढे होऊन ते कपाटाचं दार हळूहळू उघडायला लागले. आणि म्हणू लागले, "हे प्राणी तुमच्यापेक्षा हुशार आहेत बरं का... तुमचं बोलणं ऐकूनच ते बदलून गेले असतील, पण बघूया...."

काकांचं वाक्य अजून पूर्णही झालं नव्हतं तेवढ्यात एक दोन बोटं उघडलेल्या त्या दारातून एक उंदीर बाहेर आला आणि पळाला. तो आल्याबरोबर मी आणि लल्ला ओरडत तिथून बाहेर पळत सुटलो.

आम्हाला पळताना बघून काका जोरजोरात हसत म्हणाले, " अरे हे प्राणी तुमच्या पेक्षा कमी घाबरट आहेत हे आजच समजलं.."

*हिंदी संदर्भ अंक १३९ (मार्च - एप्रिल २०२२ ) मधून साभार.*

*ही गोष्ट राजकमल प्रकाशनद्वारे प्रकाशित कृष्णकुमार यांच्या 'आज नहीं पढुंगा'या पुस्तकातून घेतली आहे.*

*§§§*

---

लेखक : **कृष्णकुमार** - प्रसिद्ध शिक्षण तज्ज्ञ, शिक्षणाविषयी चिंतनात्मक लेखन करतात. दिल्ली विश्वविद्यालयात प्रोफेसर आणि एन. सी. ई. आर. टी. चे निदेशक म्हणून काम केले आहे. मेरा देश और तुम्हारा देश आणि शांती का समर ही दोन पुस्तके गाजली. शिक्षा और ज्ञान, चुडी बाजार में लडकी आणि मुलांसाठी पुडियोंकी गठरी अशी पुस्तके अलीकडेच प्रसिद्ध झाली आहेत.

चित्र **: पूजा के. मेनन** - कम्युनिकेशन डिझाईनची विद्यार्थिनी.

मराठी अनुवाद : **सौमित्र**, नेस्ट फार्मा कंपनीत कार्यरत, भाषांतराची आवड.

# शैक्षणिक संदर्भ द्वैमासिकाविषयी

*शैक्षणिक संदर्भ हे पालकनीती परिवाराचे द्वैमासिक ऑगस्ट १९९९ पासून संदर्भ सोसायटी प्रकाशित करत आहे. मराठीतून चांगले विज्ञान वाचायला मिळावे, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या कुतूहलाला प्रोत्साहन मिळावे, अनुभवांना जोडून असलेल्या विज्ञानाची सहज ओळख व्हावी आणि समाजात वैज्ञानिक दृष्टिकोन वाढावा,हे याचे उद्देश आहेत.*

*२०१८ सालापासून आम्ही शैक्षणिक संदर्भची छापील आवृत्ती न काढता इ-अंक प्रकाशित करत आहोत व इमेल आणि व्हॉट्सॅपच्या माध्यमातून वाचकांपर्यंत पोहोचवत आहोत.*

*आपल्याला आमचे अंक वाचायचे असल्यास आपला इ-मेल पत्ता आणि व्हॉट्सॅप क्रमांक(ऐच्छिक) आम्हाला sandarbh.marathi@gmail.comवर पाठवावा. दर आठवड्याला एक लेख व दर दोन महिने पूर्ण झाल्यावर आठ लेखांचा एकत्रित एक अंक असे आपल्याला पीडीएफ स्वरूपात मिळतील.*

*www.sandarbhsociety.org या वेबसाईटला जरूर भेट द्या. जुने अंकही त्यावर पीडीएफ स्वरूपात उपलब्ध आहेत.*

*हा उपक्रम विनामूल्य आहे, पण आपण आपला सहभाग ऐच्छिक देणगी रूपात संदर्भ सोसायटीकडे पाठवू शकता. अधिक माहिती वेबसाइटवर उपलब्ध आहे.*

- ***संपादक मंडळ,शैक्षणिक संदर्भ व विश्वस्त मंडळ, संदर्भ सोसायटी***